Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

३३ /२०२४

**विषय - महात्मा गांधी जयंती निमित्त 'विशेष स्वच्छता' अभियान**

सर्व अधिविभाग प्रमुख, संचालक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवकांना कळविण्यात येते की, महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून **दि. ०१ सप्टेंबर, २०२४ ते दि.३० सप्टेंबर, २०२४** या कालावधीमध्ये शिवाजी विद्यापीठामध्ये **'विशेष स्वच्छता अभियान'** राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत खालील उपक्रम राबविण्यात यावेत.

१) सर्वांनी आपल्या अधिविभाग /विभागाची अंतर्गत स्वच्छता करावी.

२) आपल्या अधिविभाग व विभागातील सध्या वापरात न येणारे, निरुपयोगी, कालबाहय झालेले साहित्य व रेकॉर्डबाबत निर्लेखन करण्याची कार्यवाही नियमानुसार करावी.

३) **विभाग प्रमुख, साठापडताळणी** यांनी साठापडताळणी विभागातील एक प्रतिनिधी, आस्थापना विभागातील एक प्रतिनिधी व अभियांत्रिकी विभागातील एक प्रतिनिधी घेवून सर्व अधिविभाग व प्रशासकीय विभाग यांना भेटी देवून अधिविभाग व विभागात सुस्थितीत किंवा वापरात येणारे फर्नीचर/साहित्य विनावापर असल्यास याची माहिती घ्यावी. तसेच अधिविभाग व विभागातील वापरात न येणारे व निरुपयोगी व नियमानुसार निर्लेखन करणे आवश्यक असणाऱ्या साहित्याची माहिती घ्यावी. व त्याचा अहवाल तयार करुन त्याची एक प्रत संबधित अधिविभाग/प्रशासकीय विभागास व एक प्रत आस्थापना विभागास सादर करावी.

४) अधिविभाग/विभागाच्या इमारतीच्या सभोवतालच्या परिसराची स्वच्छता करावी. या कालावधीत विभाग/अधिविभाग, व आजूबाजूच्या परिसरात कोणताही कचरा व कचरासदृश्य साहित्य राहणार नाही यास्तव आवश्यक सर्व कार्यवाही करावी.

उपरोक्त केलेल्या कार्यवाहीचा अहवाल (फोटोसह) वरिष्ठांच्यामार्फत आस्थापना विभागास सादर करावा.

(डॉ. व्ही. एन. शिंदे )
कुलसचिव

जा. क्र. आस्थापना/ 1548

दि. 29 AUG 2024

प्रति,

माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, विद्यार्थी/विद्यार्थीनींनी

२) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.

३) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.